आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दु ३.०० वाजता

२३ जून २०२४ - रविवार

१८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन उद्यापासून सुरू होणार आहे. अधिवेशनादरम्यान नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी होईल. लोकसभेचे हंगामी सभापती ज्येष्ठ भाजप खासदार भर्तृहरी महताब हे नवनिर्वाचित खासदारांना शपथ देतील. लोकसभा सभापतीपदासाठी येत्या २६ जून रोजी निवडणूक होणार आहे. राज्यसभेचं अधिवेशन येत्या २७ तारखेला सुरू होणार आहे. त्याच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर होईल. हे अधिवेशन ३ जुलैपर्यंत चालेल.

<><><><><>

मान्सूनच्या पार्श्वभूमीवर पूरव्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत गृहराज्यमंत्री नित्यानंद राय, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील तसंच विविध खात्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-यूजी परीक्षेत अतिरिक्त गुण मिळालेल्या सर्व एक हजार ५६३ विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा आज होत आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या उच्चस्तरीय समितीच्या अहवालावर सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलेल्या निरीक्षणांच्या आधारे या विद्यार्थ्यांना दिलेले अतिरिक्त गुण रद्द करून फेरपरीक्षेचा निर्णय घेतल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं म्हटलं आहे. ज्या विद्यार्थ्यांना फेरपरीक्षा द्यायची नसेल, त्यांना अतिरिक्त गुणांविना मिळालेले गुण ग्राह्य धरले जातील, असंही संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचा तपास शिक्षण मंत्रालयानं सीबीआय, अर्थात केंद्रीय गुन्हे अन्वेषण संस्थेकडे सोपवला असून राष्ट्रीय चाचणी संस्थेचे महासंचालक सुबोध कुमार सिंग यांना पदावरून हटवलं आहे. भारतीय व्यापार प्रोत्साहन मंडळाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक प्रदीप सिंग खरोला यांच्याकडे एनटीएच्या महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

**<><><><>**

विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशपरीक्षा राज्यपातळीवर घेण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे. वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेश परीक्षा म्हणजेच नीट-पीजी पुढे ढकलल्याबद्दल त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली आहे.

विविध प्रवेशपरीक्षांवरच्या आक्षेपांच्या पार्श्वभूमीवर आजची नीट-पीजी रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. विद्यार्थ्यांचं हित लक्षात घेऊन हा निर्णय घेतला आहे आणि परीक्षेचं सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर होईल असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादी चळवळीची कंबर मोडली असून हे पोलिसांचं मोठं यश असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. गडचिरोलीतल्या जहाल नक्षलवादी दाम्पत्याने काल आत्मसमर्पण केलं त्यावेळी आयोजित संवाद मेळाव्यात उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. गेल्या चार वर्षात गडचिरोलीतला

एकही माणूस नक्षलवादी चळवळीत सहभागी झाला नाही. या काळात सरकारने विविध योजना लोकांपर्यंत पोहोचवल्या असं फडणवीस म्हणाले.

<><><><><>

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल रात्री झालेल्या सामन्यात भारतानं बांगलादेशचा ५० धावांनी सहज पराभव केला. अँटीग्वा इथल्या सर व्हिव्हियन रिचर्ड्स मैदानावर झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित २० षटकांमध्ये पाच गड्यांच्या मोबदल्यात १९६ धावांचं आव्हान बांगलादेशसमोर ठेवलं. बांगलादेशला २० षटकांमध्ये ८ गड्यांच्या मोबदल्यात १४६ धावाच करता आल्या.

आज सकाळी झालेल्या सामन्यात अफगणिस्ताननं ऑस्ट्रेलियाच्या संघावर २१ धावांनी मात केली. जमैकात किंगस्टन इथं झालेल्या या सामन्यात अफगाणिस्ताननं निर्धारित २० षटकांत ५ गड्यांच्या मोबदल्यात १४८ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल ऑस्ट्रेलियाचा संघ १९ षटकं आणि २ चेंडूंमध्ये १२७ धावांवरच गारद झाला.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला शेवटचा सामना आज बंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदानावर होत आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तोपर्यंत दक्षिण आफ्रिकेनं दोन खेळाडूंच्या मोबदल्यात २१ षटकं, तीन चेंडूंमध्ये १०४ धावा केल्या होत्या.

**<><><><>**

टेनिसपटू सुमीत नागल यानं आगामी २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमधलं आपलं स्थान निश्चित केलं आहे. या हंगामात सुमितनं हेलबॉन चॅलेंजर आणि चेन्नई चॅलेंजर स्पर्धेचं जेतेपद पटकावलं आहे. यापूर्वी टोक्यो ऑलिम्पिकमध्ये सुमीत दुसऱ्या फेरीपर्यंत पोहोचला होता. रोहन बोपण्णा आणि एन. श्रीराम बालाजी ही जोडीही पुरुष दुहेरीत ऑलिम्पिकसाठी पात्र ठरली आहे.

**<><><><>**

दिवंगत शामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्मृतीदिनानिमित्त केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे राष्टीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी आज मुखर्जी यांना पुष्पांजली वाहिली. स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ज्ञ तसंच सामाजिक कार्यकर्ते असलेले मुखर्जी हे एक बहुआयामी व्यक्तीमत्व होते असं नड्डा यावेळी म्हणाले. नवी दिल्लीत भाजपाच्या मुख्यालयात नड्डा यांच्या हस्ते कार्यकर्त्यांना रोपांचं वाटपही करण्यात आलं.

**//<><><><>//**